## जनसंपर्क विभाग

जळगाव दि.२ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या सन २०१९-२० च्या २८७.४१ कोटी रुपयांच्या अर्थसंकल्पाला कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या अधिसभेत मान्यता देण्यात आली. या अर्थसंकल्पात २०.३२ कोटी रुपयांची तूट दर्शविण्यात आली आहे.

गुरुवार, दि.२ मे रोजी अधिसभेची बैठक झाली. सदस्य दीपक बंडू पाटील यांनी अधिसभेत हा अर्थसंकल्प सादर केला. विकासाला चालना देणारा असा हा अर्थसंकल्प असून यामध्ये परिरक्षणासाठी १९१.९८ कोटी रुपये, योजनांतर्गत विकासासाठी रुपये ४८.८६ कोटी आणि विशेष कार्यक्रम/योजनांसाठी ४६.५७ कोटी अशी खर्चासाठी एकूण २८७.४१ कोटींची तरतूद करण्यात आली आहे. या अर्थसंकल्पात उत्पन्नाची बाजू २६७.०९ कोटी इतकी असल्यामुळे रुपये २०.३२ कोटी इतक्या तुटीचा हा अर्थसंकल्प आहे. खर्चात बचत करुन ही तुट भरुन काढण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला आहे. विद्यार्थी केंद्रबिंदू मानून विकासाला चालना देणारा असा हा अर्थसंकल्प आहे.

विद्यापीठात शिक्षण घेणारे बहुतांश विद्यार्थी हे ग्रामीण व आदिवासी भागातील असून त्यांच्या शिक्षणासाठी आवश्यक त्या सुविधा देण्याचा संकल्प या अर्थसंकल्पात करण्यात आला आहे. `सर्वांसाठी शिक्षण- समाजासाठी शिक्षण- देशाच्या प्रगतीचे लक्षण - नाविन्यपूर्ण शिक्षण` या न्यायाने विविध योजना राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या अर्थसंकल्पात काही योजना प्रस्तावित करण्यात आल्या. त्यामध्ये बहिणाबाई चौधरी यांच्या जन्मदिनी दोन दिवसीय विद्यार्थी साहित्य संमेलन घेतले जाणार असून त्यासाठी ५ लाखाची तरतूर करण्यात आली, विद्यापीठ क्रीडा मंडळातर्फे विद्यापीठस्तरीय क्रीडा महोत्सव घेतला जाणार असून त्यासाठी १२ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली. अजून एक वैशिष्ट म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजनेत विद्यार्थ्यांना प्रति तास ३० रुपये ऐवजी ४० रुपये प्रतितास देण्याची तरतूद करण्यात आली आहे. विद्यार्थी विमा योजनेत अपघाती निधन झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांना अडीच लाख रुपये रक्कमेचे संरक्षण विमा कंपनी व कुलगुरु निधीतून देण्यात येते. तथापि, आता अपघाती निधन झालेल्या विद्यार्थ्यांच्या पालकास विमा कंपनी कडून ५ लाख व कुलगुरु निधीतून १० हजार असे एकूण ५ लाख १० हजार रुपयांचे संरक्षण देण्याचे प्रस्तावित आहे. खेळाडू विद्यार्थ्यांच्या दैनंदिन भत्त्यात वाढ करण्यात आली असून आता तीनशे रुपये दैनंदिन भत्ता दिला जाणार आहे. कनिष्ठ महाविद्यालयातील खेळाडूंसाठी स्वतंत्र कोच नेमून त्यांची क्रीडा क्षमता वाढविण्याचा मानस अर्थसंकल्पात व्यक्त करण्यात आला आहे.

विद्यापीठाच्या बहि:स्थ शिक्षण विभागामार्फत एम.ए. (मानसशास्त्र), स्त्री अभ्यास, योगीक विज्ञान व स्वयं अध्ययन साहित्य विकसन हे अभ्यासक्रम सुरु केले जाणार आहेत. आता नवीन कायदयाप्रमाणे विद्यार्थी परिषदेच्या निवडणूका खुल्या पध्दतीने घेतल्या जाणार असल्यामुळे त्यासाठी ५ लाखाची तरतूद करण्यात आली. शहीद झालेल्या जवानांच्या पाल्यांच्या शिक्षणासाठी शहीद जवान पालक दत्तक योजना सुरु करण्यात येणार आहे. विद्यापीठ परिसरात पाणी जिरवण्यासाठी बंधारे बांधण्याचा महत्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेण्यात येणार असून त्यासाठी १ कोटीची तरतूद करण्यात आली आहे. नंदूरबार येथील आदिवासी अकादमीसाठी शासनाकडून दरवर्षी ५ कोटी निधी दिला जाणार आहे. विद्यापीठ निधीतून देखील यावर्षी त्यासाठी २.५ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

याशिवाय इतर ठळक बाबी म्हणजे स्वच्छ व सुंदर महाविद्यालय स्पर्धा योजना नव्याने समाविष्ट करण्यात आली असून त्यासाठी दोन लाखाची तरतूद करण्यात आली आहे. विद्यापीठ व महाविद्यालये यांच्या रेकॉर्ड डिजिटायझेशन व प्रशिक्षणासाठी ५५ लाखाची तरतूद करण्यात आली आहे. दिव्यांग कर्मचाऱ्यांसाठी ५ लाखाने तरतूद वाढविण्यात आली आहे. वृक्षरोपणासाठी २० लाख रुपयांची तरतूद या वर्षापासून केली गेली.

योजनांतर्गतच्या विकासात्मक बाबींवरील खर्चासाठी ३ कोटीने तरतूद वाढविण्यात आली असून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांसाठी १.२५ कोटी, परीक्षा व मूल्यमापन विभागासाठी २६.६३ कोटी तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये ई-सुविधा अंतर्गत सेवांसाठी २५ लाखाने वाढ करण्यात आली. नव्याने प्रश्नपेढी तयार करण्याच्या कार्यवाहीसाठी ५० लाख, विद्यापीठ प्रशाळा व उपकेंद्र यासाठी १५.१५ कोटी तरतूद करण्यात आली आहे. विविध प्रशाळांमध्ये प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु केले जाणार असून मोठया कार्पोरेट कंपन्यांना सॅम्पल टेस्टिंग व त्यांच्या उत्पादनासाठी लागणारा सल्ला देणे याअंतर्गत शुल्क आकारण्याचे प्रस्तावित केले आहे. विद्यापीठ संचलित महाविद्यालय नंदूरबार जिल्हयातील मोलगी येथे सुरु करण्याचे प्रस्तावित असून त्यासाठी ५० लाखाची तरतूद करण्यात आली. या महाविद्यालयात स्थानिक गरजा लक्षात घेवून प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरु केले जातील. केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षासाठी ५ लाखाने तरतूद वाढविण्यात आली. पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी संशोधन, प्रकाशन, कार्यशाळा यासाठी नव्याने ५ लाखाची तरतूद करण्यात आली. पदव्युत्तर विद्यार्थ्यांना कौशल्याभिमुख शिक्षणासाठी ५ लाखाची तरतूद करण्यात आली. संशोधन व विकास विभागांतर्गत कामकाज आयसीटीद्वारे व्हावेत यासाठी ७५ लाखाची भरघोष वाढीव तरतूद तसेच कुलगुरु संशोधन प्रोत्साहन योजनेसाठी देखील १.५० कोटीची तरतूद हे वैशिष्टये सांगता येईल. प्रयोगशाळा ते जमीन अंतर्गत विद्यापीठ परिसर व प्रताप तत्वज्ञान केंद्र, अमळनेर येथील जागेवर सेंद्रिय शेतीला  शेती योग्य प्लॉट तयार करण्यासाठी ५ लाख तरतूद करण्यात आली. विद्यार्थी विकास व क्रीडा विभागांतर्गत विविध योजना राबविण्यात येणार असून त्यासाठी ९.६६ कोटींची भरीव तरतूद करण्यात आली आहे.

प्रवासी पास सवलत योजनेसाठी ५ लाख तरतूद तसेच आर्थिकदृष्टया दुर्बल विद्यार्थ्यांना अर्थसहाय्य म्हणून १५० लाखाची तरतूद करण्यात आली आहे. विशेष म्हणजे यामध्ये गतवर्षी पेक्षा ५० लाखाने वाढ करण्यात आली आहे. क्रीडाच्या १३ योजनांसाठी यापूर्वी पेक्षा ५ लाखाने वाढ करण्यात आली असून आता १३५ लाखाची तरतूद करण्यात आली. विद्यार्थी/विद्यार्थिनी वसतिगृहासाठी ५७लाख, ज्ञानस्त्रोत (ग्रंथालय) केंद्रासाठी ३५ लाख, विविध इमारत बांधकाम व विकास कामांसाठी ३३.११ कोटी, प्रशाळांच्या उपकरण खरेदीसाठी ४.७५ कोटी यासोबतच नव्याने व्होकेशनल ॲण्ड कम्युनिटी एज्युकेशन सेंटर (आदिवासी अकादमी अंतर्गत) साठी २.५० कोटी, सीलेज एरिया डेव्हलपमेंट प्रोग्रामसाठी २ कोटी, पंडित दिनदयाल सेंटर फार रुरल डेव्हलपमेंटसाठी १.३६ कोटी तरतूद दर्शविण्यात आली आहे. दीपक पाटील यांनी बहिणाबाईंच्या कवितांचा व सुविचारांचा वापर करीत अर्थसंकल्प सादर केला.

दीपक पाटील यांनी अर्थसंकल्प मांडल्यानंतर नितीन ठाकूर, अमोल मराठे यांनी कपात सूचना मांडली. त्यावर चर्चा झाल्यानंतर कपात सूचना मागे घेण्यात आली. या अर्थसंकल्पाचे सर्व सदस्यांनी स्वागत केले. विविध प्रकारच्या नवीन योजना या अर्थसंकल्पात मांडण्यात आल्या असून त्याद्वारे विद्यापीठ विकासाला चालना मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करुन सदस्यांनी काही सूचना देखील केल्या. बैठकीत प्रारंभी पुलवामा दहशतवादी हल्ल्यात व गडचिरोलीत नक्षलवादी हल्ल्यात शहीद झालेल्या जवान व पोलीसांना श्रध्दांजली अर्पण करणारा ठराव माडण्यात आला. याशिवाय माजी व्य.प.सदस्य छाया नेतकर, माजी सिनेट सदस्य इच्छाराम पाटील, प्राचार्य अ.नि.माळी, सहायक क्रीडा संचालक आर.ए.पाटील, श्रेया काजळे, नाना पाटील, प्रा.शिरीष चौधरी आदी दिवंगतांना श्रध्दांजली

वाहणारा शोकप्रस्ताव मांडण्यात आला. प्रा.संध्या सोनवणे, नितीन ठाकूर, दिनेश नाईक, सुरेश पवार, अमोल मराठे, मनिषा चौधरी, विष्णू भंगाळे आदींनी हे ठराव मांडले. विद्यापीठातील कवयित्री बहिणाबाई चौधरी अध्यासन केंद्राला मंजूरी दिल्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे तसेच विविध सांस्कृतिक व क्रीडा महोत्सवात विद्यापीठाला पारितोषिक प्राप्त झाल्याबद्दल व इतर बाबींबाबत अभिनंदनाचे विविध ठराव मंजूर करण्यात आले.

प्रश्नोत्तराच्या तासात प्रा.सुनील गोसावी, प्रा.एकनाथ नेहते, नितीन झाल्टे यांच्या प्रश्नांना प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहुलीकर, प्रा.मोहन पावरा, श्री.दिलीप पाटील, प्राचार्य एल.पी.देशमुख, प्रा.ए.बी.चौधरी, बी.पी.पाटील यांनी उत्तरे दिली. सायंकाळी उशिरापर्यंत चाललेल्या या बैठकीत विविध विषयांवर झालेल्या चर्चेत श्री.प्रकाश पाठक, प्राचार्य डी.आर.पाटील, प्राचार्य पी.पी.छाजेड, प्रा.अनिल पाटील, प्राचार्य आर.एस.पाटील, प्रा.संजय सोनवणे, प्रा.एकनाथ नेहते. प्रा.नितीन बारी, प्रा.गौतम कुवर, प्रा.मोहन पावरा, प्रा.किशोर कोल्हे, विष्णू भंगाळे, अमोल सोनवणे, दिनेश नाईक, दिनेश खरात, नितीन ठाकूर, मनिषा चौधरी, अमोल मराठे, राजेंद्र नन्नवरे, शब्बीर सय्यद, नितीन झाल्टे, राजेंद्र जाखडी, सुरेश पाटील, गोपीचंद पाटील यांनी भाग घेवून आपली मते मांडली. निवडणूक आचारसंहिता, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी भरती, शासनाचा ८ मार्च, २०१९ चा शासन निर्णय आदी विषयांवर देखील बैठकीत चर्चा करुन सदस्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी सदस्यांच्या सर्व भावनांची दखल प्रशासनाकडून घेतली जाईल अशी ग्वाही दिली. बैठकीचे सुत्रसंचालन कुलसचिव भ.भा.पाटील यांनी केले.

---

जा.क्रः कबचौ उमवि/१६/हस्तदेय/२०१९ दिनांक : २ मे, २०१९

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकातून प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,
स्वाक्षरीत प्रत/-
( सुनील पाटील )
जनसंपर्क अधिकारी